LLOYDS METALS

25th September, 2026

To,

BSE Limited
Corporate Services Department
Phiroze Jeejeebhoy Towers,
Dalal Street, Mumbai – 400001
BSE Scrip Code: 512455

National Stock Exchange of India Limited
Corporate Communications Department
Exchange Plaza, Bandra Kurla Complex,
Bandra (East), Mumbai - 400051
NSE Symbol: LLOYDSME

Sub: Newspaper Advertisement regarding dispatch of Postal Ballot Notice

Dear Sir / Madam,

Pursuant to Regulation 30 of the Securities and Exchange Board of India ("**SEBI**") (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("**Listing Regulations**"), read with the applicable provisions of the Companies Act, 2013 ("**the Act**"), the rules made thereunder and the relevant circulars issued by the Ministry of Corporate Affairs ("**MCA**") from time to time, and further to our letter dated 24th September, 2026 we had submitted the public notice intimating dispatch of the Postal Ballot Notice along with details of remote e-voting and related matters for seeking approval of the Members for following items:

Sr. No.	Description of Resolution
1.	Approval for appointment of Mr. Avijit Ghosh (DIN: 03101511), as a Non-Executive, Independent director of the company
2.	Approval for conversion of loan into equity shares of the Company pursuant to Section 62(3) of the Companies Act, 2013

We hereby inform that the dispatch of the Postal Ballot Notice to the Shareholders through electronic mode was completed on 24th September, 2026.

Further, in compliance with the applicable provisions, the Company has published the said public notice on 25th September, 2026 in the following newspapers:

1. Business Standard (English - All Editions)
2. Navrashtra (Marathi Daily)

We enclose herewith copies of the newspaper advertisements published in the aforesaid newspapers for your reference and record.

The same is also available on the Company's website at www.lloyds.in.

The same may please be taken on record and suitably disseminated to all concerned.

Thanking you,

Yours Sincerely,
For Lloyds Metals and Energy Limited

Akshay Pankaj Vora
Digitally signed by Akshay Pankaj Vora
Date: 2026.09.25 12:10:55 +05'30'

Lloyds Metals and Energy Limited
Mumbai

Akshay Vora
Company Secretary
Encl.: As above.

Vishal Mega Mart adds expansion plan to cart

But promoter stake sale remains key overhang on the stock

RAM PRASAD SAHU
Mumbai, 24 September

Competitive pressures, the overhang of a stake sale by promoters, and premium valuations have weighed on the stock of retail major Vishal Mega Mart over the past year. These headwinds have led to a 30 per cent drop in the share price of the value retailer. Brokerages, however, are bullish on the retailer's prospects, given double-digit same-store sales growth (SSSG), its expansion plan, and margin expansion from scale benefits. After the correction, valuations compared with peers have come down to more palatable levels. At the current price, the company is trading at around 40x its 2027-28 earnings estimates.

The company outperformed its peers in the first quarter (April-June/Q1) of 2026-27 (FY27), with SSSG growth of 10 per cent compared with 7 per cent reported by peer value retailers. About 7 per cent of the gains came from new customers, while the rest came from higher purchases by existing customers. The retailer was able to support its customers amid high inflation through lower promotional intensity and stable pricing in opening- and mid-price products. The company's hyperlocal (quick-commerce/qcom) delivery also scaled well, with registered users up 44 per cent year-on-year to 14.1 million.

While there could be quarterly volatility due to the festival period or seasonal shifts, the company is aiming for sustained double-digit SSSG for the full year. Growth would be aided by its differentiated private-label strategy and healthy traction in the qcom business, which varies between 2 per cent and 10 per cent of the mix across stores. The company seeks to pursue volume growth even as it maintains leadership in opening- or entry-level price points. Given that sales are at ₹10,000 per square foot for 2025-26, there is headroom for further growth.

Under pressure



Source: Bloomberg, BSE

Brokerages are positive on the company's potential to expand both its large- and small-format stores. In the large-format (17,000 square feet) segment, there is potential to add 1,200 stores — 100 a year — over the next 10-12 years. The company is also expanding its small-store format to cater to towns with populations of less than 50,000 in relatively more saturated states such as Uttar Pradesh and Haryana. It added three small-format stores in Q1FY27, taking the total count to 16.

While small-format stores are about half the size of regular stores, they deliver comparable revenue per square foot and return on capital employed ratios. The company estimates the long-term opportunity for smaller stores at 4,000 across the country. The company has also started a relatively premium, apparel-only format, Belong & Co, in Delhi, targeting a younger and more affluent consumer base.

The retailer is expected to reinvest the gross-margin savings from scale benefits to improve product quality and its price proposition. Motilal Oswal Research remains positive on the company, considering its consistent growth trajectory and potential for margin expansion led by operating leverage. It has reiterated its "buy" rating with a revised target price of ₹135. However, analysts led by Aditya Bansal of the brokerage point out that the stake sale by the promoter, Samayat Services LLP, which is owned by Kedaara Capital and Partners Group, remains a key overhang on the stock's performance despite the stellar operating performance. The promoters have been reducing their stake from just under 75 per cent after the initial public offering in December 2024 to the current level of 40 per cent.

A positive is the continuity of leadership, with the company's Chief Executive Officer and Managing Director Gunender Kapur getting another five-year extension. This, along with the visibility of the larger management team at the analyst meeting, according to HSBC Research, should allay some investor concerns and drive valuation improvement, assuming the recent strong operational performance continues. While the second quarter (July-September/Q2) of FY27 could see some moderation in performance due to the festival-season shift, analysts led by Nihal Mahesh Jham of the brokerage expect unchanged full-year performance.

YOUR MONEY

Check renewed health cover for hidden limits

HIMALI PATEL

A consumer commission in Belagavi, Karnataka, held Star Health and Allied Insurance liable for deficiency in service. The insurer had capped a claim at ₹2 lakh under a disease-specific sub-limit it could not establish was part of the renewed policy.

Devdutt Kopikar, insured since 2019, had raised his sum insured from ₹3 lakh to ₹5 lakh. After his stroke in March 2025, his family claimed ₹4,28,308. Star Health paid ₹2 lakh. It could not prove that earlier terms continued after renewal. The commission ordered payment of ₹2,28,308 with 12 per cent annual interest, plus ₹10,000 compensation and ₹5,000 litigation costs, within 60 days.

Can policy features change?

An insurer cannot introduce a sub-limit, co-payment or exclusion unilaterally. "A regulator-sanctioned product revision communicated months in advance may change terms at renewal," says Amit Tungare, managing partner, Asahi Legal.

He adds that a product may be enriched with higher cover or broader benefits, or it may be quietly narrowed through a disease-specific cap, a room-rent ceiling or an age-linked co-payment.

"If a product is withdrawn or modified, the insured should be given the option to migrate to a similar product of their choice," says Hari Radhakrishnan, expert, Insurance Brokers Association of India (IBAI).

Compare old and new terms

Compare the policy schedules for sum insured, members covered and policy period. Read the policy wording for detailed terms. "The Customer Information Sheet (CIS) summarises coverage terms and can be used for comparison," says Radhakrishnan.

"Compare the sum insured, sub-limits, room-rent caps, co-payments, waiting periods and exclusions," says Yash Raj, senior associate, 3Sixty Law Group. Also check the cashless authorisation process, network hospitals, and no-claim bonus.

Undisclosed restrictions

A restriction must form part of the policy and have been communicated to and accepted by the policyholder. Request the claim-year wording, schedule, CIS, renewal proposal and claim assessment. Ask which clause supports each deduction. Mohit Mansharamani, counsel, SKV Law Offices, emphasises that when an insurer relies on an exclusion clause, the burden of proving it lies on the insurer.

"Where the deduction is contrary to the policy, seek reversal of such deduction and payment of the balance claim," says Soayib Qureshi, partner, PSL Advocates & Solicitors.

How to seek redress

Complain first to the insurer. Approach the Insurance Ombudsman after rejection or a month without a reply from the insurer. "File an Ombudsman complaint within one year. The amount should not exceed ₹50 lakh," says Mansharamani. The Ombudsman may first mediate and then pass an award that is binding on the insurer, which must comply within 30 days. Alternatively, approach a consumer commission.

Increasing sum insured

An insurer may underwrite the increase but cannot reassess the existing cover, which also retains its continuity benefits. "Disclose illnesses, hospitalisations, surgeries and ongoing medication since the previous proposal," says Raj. Read the proposal before signing, retain it and other supporting records.

"Treat the enhancement as approved only after written confirmation and a schedule showing the increased sum insured and its conditions," says Raj. Ensure your declaration is recorded in the schedule. If the increase is declined, seek reasons in writing. Renew existing cover on time.

Watch out for restrictions

Waiting periods, including for pre-existing diseases, may restart on the increased sum insured. "A claim for a condition still subject to a waiting period on the increase may be limited to the original sum insured," says Qureshi. The enhanced limit's 60-month moratorium starts on the enhancement date. "The enhanced portion remains open to challenge on disclosure grounds for five years from the date of enhancement," says Mansharamani.

Check the terms of enhanced cover

- Verify new sum insured, effective date, covered members in the revised schedule
- Review the premium and exclusions applicable to enhanced sum insured
- Check for waiting periods on pre-existing diseases and specified illnesses
- Check Customer Information Sheet, policy wording for sub-limits on enhanced cover

The writer is a Mumbai-based independent journalist

Who gets your PF money? Steps to file nomination at EPFO portal

Members of the Employees' Provident Fund Organisation (EPFO) should keep their nomination details updated to ensure their provident fund, pension and insurance benefits can be claimed by eligible family members after their death. The nomination can be filed online through the EPFO member portal using an Aadhaar-verified Universal Account Number (UAN).

How to file e-nomination

- Log in to the EPFO member portal using your UAN and password.
- Go to "Manage e-nomination" and select the option to enter a new nomination.
- Update the family details and add eligible family members.
- Enter the nominee's details, including Aadhaar, name, date of birth, relationship and address.
- Allocate the desired share among nominees; the total must add up to 100 per cent.
- Save the family details and EPF nomination.
- Complete the Aadhaar-based e-sign using the OTP sent to the mobile number linked with Aadhaar.
- Check "nomination history" to confirm that the status shows as successful.

Members should review their nomination after marriage, childbirth, or other changes in family circumstances. They can file a fresh e-signed nomination to replace an earlier one.

Read the full story here: mybs.in/2g9L6lg

COMPILED BY AMIT KUMAR

आता खिशाला परवडणार विमा

कमिशनपासून ते विक्रीपर्यंत अनेक नियम बदलणार

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. विमा खरेदीदारांसाठी ही एक आनंददायी बातमी आहे. भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण (आयआरडीए) देशाच्या विमा क्षेत्रात आतापर्यंतचा सर्वात मोठा बदल करणार आहे. ग्राहकांना चुकीच्या विक्रीपासून वाचवणे आणि जास्त वितरण खर्च कमी करून विमा परवडणारा बनवणे, हा याचा साधा उद्देश आहे.

एजंटचे 'अपफ्रंट कमिशन' कमी होईल : पूर्वी, विमा कंपन्या पहिल्या वर्षाचा प्रीमियम मिळाल्यावर ३०% ते ४०% इतके मोठे 'अपफ्रंट कमिशन' देत असत. आता, आयआरडीए ही पद्धत रद्द करून त्याऐवजी 'स्टॅगर्ड मॉडेल' आणत आहे. याचा अर्थ असा की, कमिशन आता एकाच वेळी दिले जाणार नाही, तर पॉलिसीच्या मुदतीदरम्यान हप्त्यांमध्ये दिले जाईल. यामुळे एजंटना केवळ पॉलिसी विकण्याऐवजी ग्राहकांना दीर्घकालीन सेवा देण्यावर लक्ष केंद्रित करता येईल.

बँकांच्या सक्तीवर बंदी

अनेकदा असे दिसून येते की, जेव्हा तुम्ही कार कर्ज किंवा गृह कर्ज घेण्यासाठी बँकेत जाता, तेव्हा बँकेचे कर्मचारी अशी अट घालतात की, त्यांच्या भागीदार कंपनीकडून महागडा विमा खरेदी केल्यासच कर्ज मंजूर केले जाईल. आयआरडीएने आता क्रेडिट-लिंक्ड विम्याचे हे अनिवार्य बंडलिंग पूर्णपणे प्रतिबंधित करणार आहे. अहवालानुसार, केवळ प्रीमियम रकमेच्या आधारावर कमिशन निश्चित करण्याऐवजी, ते विमा उत्पादनाची गुंतागुंत, ग्राहक सेवा, विक्रीचे प्रयत्न आणि वितरण वाहिन्या यांसारख्या घटकांशी जोडण्याचा प्रस्ताव आहे. नियामकाने असेही म्हटले आहे की, आर्थिक वर्ष २०२३ ते २०२५ दरम्यान कॉर्पोरेट एजंटकडून मिळालेल्या नवीन व्यवसायाच्या नमुन्यात, कॉर्पोरेट एजंटकडून मिळालेल्या नवीन व्यवसायातून निर्माण झालेला प्रीमियम २८% नी वाढून ६३,००० कोटी रुपयांवरून ८०,००० कोटी रुपयांपर्यंत पोहोचला.

२८% ने घसरला पॉलिसीबझारचा शेअर

३०% ते ४०% कमिशन मिळत असे एजंटना

प्रीमियमच्या तुलनेत वितरकांना दिलेली रक्कम

वर्ष नवीन	व्यवसाय	वितरकांना दिलेले प्रीमियम	देय रकमेतील वाटा
आर्थिक वर्ष २०२३	६३,००० कोटी	९,४८० कोटी	१५.२%
आर्थिक वर्ष २०२५	८०,००० कोटी	२१,६०० कोटी	२७%
वाढ	१७,००० कोटी	१२,०२० कोटी	११.८%

प्रीमियममध्ये सुमारे २७% वाढ आणि वितरकांना दिलेल्या रकमेत सुमारे १२५% वाढ

विमा कंपन्यांसाठी प्रस्तावित खर्च मर्यादा

विमा क्षेत्र	सध्याच्या मर्यादा	२ वर्षानंतरच्या प्रस्तावित मर्यादा	५ वर्षानंतरच्या मर्यादा
आयुर्विमा	–	१५%	१२.५%
सर्वसाधारण विमा	३०%	–	२०%

टर्म इन्शुरन्सवरील प्रस्तावित कमिशन

टर्म इन्शुरन्सचा प्रकार	वितरक कंपनी	एजंट
एक रकमी प्रीमियमसह टर्म पॉलिसी	७.५%	१०%
बहु-वर्षीय प्रीमियमसह टर्म पॉलिसी	२५%	३०%
अनेक प्रीमियमसह टर्म पॉलिसी	७.५%	१०%

वैयक्तिक माहितीशिवाय विमा उपलब्ध

आयआरडीएने विमा वेबसाइट्सवर वापरल्या जाणाऱ्या तथाकथित 'डार्क पॅटर्न्स' वर बंदी घालण्याचा प्रस्तावही दिला आहे. हे लक्षात घ्यावे की, विमा उत्पादनाची किंमत किंवा वैशिष्ट्ये तपासण्यापूर्वी ग्राहकाचा मोबाईल नंबर किंवा इतर वैयक्तिक माहिती मागण्यास मनाई असेल.

वितरकांपुढे येणार मोठ्या अडचणी

बर्नस्टाईनसारख्या जागतिक ब्रोकरेज कंपन्यांच्या मते, प्रस्तावित कमिशन कपात अपेक्षेपेक्षा खूप जास्त आहे. याचा सर्वात गंभीर परिणाम पॉलिसीबझार (पीबी फिनटेक) सारख्या कंपन्यांवर होईल. जेफरीजचा असाही विश्वास आहे की, नवीन व्यवसायावरील कमिशनमधील कपातीमुळे पीबी फिनटेकसह टर्टलमिंटच्या महसुलावर १० ते १२ टक्क्यांनी परिणाम होऊ शकतो. प्युअर-टर्म पॉलिसींवरील पहिल्या वर्षाचे कमिशन आता २५-३० टक्क्यांपर्यंत मर्यादित असेल. जीवन विमा कंपन्यांसाठी ईओएम (ईओएम) मर्यादा १२.५ टक्के निश्चित केली जाईल.

टाटाच्या एजीएम आयोजनात अडचणी

कंपनी एनसीएलटीत जाण्याची शक्यता

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. सध्या टाटा सन्समध्ये बरीच उलथापालथ सुरू आहे. देशातील सर्वात मोठ्या उद्योगसमूहांपैकी एकाची होल्डिंग कंपनी असलेली टाटा सन्स, पुढील महिन्यात आपली वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) आयोजित करण्याच्या तयारीत आहे. सध्या कंपनीसमोरील सर्वात मोठे आव्हान म्हणजे गणपूर्ती (किमान सदस्य संख्या) पूर्ण करणे हे आहे. सर टाटा ट्रस्टचे बंदीमुळे ही गणपूर्ती होत नाहीये. परिणामी, टाटा सन्स आता आपल्या महत्त्वाच्या कॉर्पोरेट बाबींचे निराकरण करण्यासाठी राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायालयात जाण्याचा विचार करत आहे. अनेक महत्त्वाचे निर्णय या सभेवर अवलंबून आहेत, ज्यामध्ये सर्वात महत्त्वाचा निर्णय म्हणजे एन. चंद्रशेखरन यांची संचालकपदी पुनर्नियुक्ती. एजीएला विलंबाची मुख्य कारणे : टाटा सन्सची वार्षिक सर्वसाधारण सभा १८ ऑगस्ट रोजी होणार होती, परंतु गणपूर्तीअभावी ती पुढे ढकलण्यात आली. यानंतर, कंपनीला कंपनी रजिस्ट्रारकडून ३ महिन्यांची मुदतवाढ मिळाली आहे.

नोएल टाटा विरुद्ध इतर संचालक

या महत्त्वपूर्ण बैठकीचा एन. चंद्रशेखरन यांच्या संचालकपदी नियुक्तीवर थेट परिणाम होईल. गेल्या गुरुवारी झालेल्या टाटा सन्सच्या संचालक मंडळाच्या बैठकीत दोन प्रमुख मुद्द्यांवरून मतभेद झाले. पहिला मुद्दा एन. चंद्रशेखरन यांना अध्यक्षपदी पुन्हा नियुक्त करण्याचा होता, तर दुसरा कंपनीच्या सूचीकरणाशी (लिस्टिंग) संबंधित होता. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी दोन्ही प्रस्तावांना तीव्र विरोध केला, तर उर्वरित संचालक मंडळाने त्यांना पूर्ण पाठिंबा दिला. तज्ज्ञांच्या मते, जोपर्यंत एक वैध एजीएम स्थापित होत नाही, तोपर्यंत चंद्रशेखरन संचालकपदी कायम राहतील.

फोनपेत २० हजारांवर सेल्स पर्सनची भरती

▸ दिल्ली, वृत्तसंस्था. डिजिटल पेमेंट कंपनी फोनपेने गुरुवारी आपल्या व्यापारी नेटवर्कचा विस्तार अधिक वेगाने करण्याची आणि लहान शहरे व गावांपर्यंत डिजिटल पेमेंट पायाभूत सुविधा पोहोचवण्याची योजना जाहीर केली. या योजनेअंतर्गत, फोनपे पुढील वर्षभरात २० हजारांहून अधिक सेल्सपर्सनची भरती करणार आहे. याव्यतिरिक्त, पुढील १२ महिन्यांत पीओएस मशीन्स आणि स्मार्ट स्पीकर्ससह ५० लाखांहून अधिक पेमेंट उपकरणे तैनात केली जातील.

कंपनीच्या म्हणण्यानुसार, यापैकी सुमारे ५० टक्के उपकरणे ग्रामीण भारतात स्थापित केली जातील, ज्यामुळे टियर-६ शहरे आणि ग्रामीण भागांमध्ये डिजिटल पेमेंटची स्वीकृती वाढेल. फोनपेने सांगितले की, त्यांच्या पगारावरील मोठ्या संख्येने फ्रंटलाइन कर्मचारी लहान शहरे आणि गावांमधील व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचतील.

येत्या सहा महिन्यांत ५.४% रोजगार वाढणार

▸ मुंबई, वृत्तसंस्था. चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाहीत विविध उद्योगांमधील कर्मचाऱ्यांची संख्या ५.४ टक्क्यांनी वाढण्याचा अंदाज आहे. ई-कॉमर्स आणि तंत्रज्ञान स्टार्टअप्स, प्रवास आणि आदरातिथ्य, आणि किरकोळ (रिटेल) क्षेत्रांमधील नोकरभरतीच्या जोरदार मागणीमुळे रोजगार वाढीला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. भरती सेवा प्रदाता टीमलीज सर्व्हिसेसच्या नवीनतम रोजगार दृष्टिकोन अहवालानुसार, आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या ऑक्टोबर-मार्च कालावधीसाठी 'निव्वळ रोजगार बदल' (एनईसी) चा अंदाज एप्रिल-सप्टेंबर सहामाहीतील ४.७ टक्क्यांवरून ५.४ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. गेल्या चार तिमाहींमधील ही सर्वोच्च पातळी आहे. 'दुसऱ्या सहामाहीतील ५.४ टक्के रोजगार वाढीचा अंदाज कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी अधिक लक्ष्य-केंद्रित दृष्टिकोनाकडे होणारे स्थित्यंतर दर्शवतो,' असे टीमलीज सर्व्हिसेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष ए. बालसुब्रमण्यन म्हणाले.

ई-कॉमर्स आणि तंत्रज्ञान क्षेत्र आघाडीवर राहणार

शेअर

बीएसई	७३,५८०.५४ (▼ १२४७.७१)
निफ्टी	२३,०६३.१० (▼ ३८३.७०)

सोने चांदी — सोने स्टँडर्ड (१० ग्रॅम): नागपूर १,५२,३००(▼) मुंबई १,५२,०००(▼)

चांदी (प्रतिकिग्रॅ) नागपूर २,३२,१००(▼) मुंबई २,३१,१००(▼)

₹/डॉलर (प्रति डॉलर) ९५.९६ | कच्चे तेल (प्रति बॅरल) १०५.४

Short News

वनप्लस लाइट बाजारात सादर

दिल्ली. ग्लोबल टेक्नॉलॉजी ब्रँड वनप्लस ने आज वनप्लस एन६ लाइट भारतात लॉन्च केला. 'पॉवरफुली बिग' या संकल्पनेसोबत आलेल्या या स्मार्टफोनमध्ये आहे प्रचंड ७ हजार मेगा हर्ट्झ बॅटरी, लीडिंग १२० डिस्प्ले, ३६मंथ फ्लुएंसी प्रोटेक्शन आणि मिलिटरीग्रेड टिकाऊपणा. प्रभावी किंमत १६२४९* मध्ये वनप्लस एन६ लाइट उपलब्ध आहे.

आयव्हीपीएचा अंदाज : आयात शुल्क कपातीचा निर्णय

सणासुदीत खाद्यतेल स्वस्त?

▸ दिल्ली, वृत्तसंस्था. केंद्र सरकारने सोयाबीन, पाम आणि सूर्यफूल तेलावरील आयात शुल्क कमी केले आहे. परिणामी सणासुदीच्या दिवसांत किरकोळ बाजारात खाद्यतेलाच्या किमती कमी होऊ शकतात, असा अंदाज इंडियन व्हेजिटेबल ऑइल प्रोड्युसर्स असोसिएशन (आयव्हीपीए) या उद्योग संघटनेने व्यक्त केला आहे. भारत आपल्या एकूण खाद्यतेलाच्या गरजेपैकी सुमारे ६० टक्के गरज आयातीद्वारे पूर्ण करतो. सरकारने बुधवारी कच्च्या सूर्यफूल तेलावरील मूलभूत सीमा शुल्क (बीसीडी) १० टक्क्यांवरून शून्यावर आणले. दरम्यान, शुद्ध केलेल्या सूर्यफूल तेलावरील बीसीडी ३२.५ टक्क्यांवरून २२.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आले आहे. कच्च्या सोयाबीन तेल आणि पाम तेलावरील बीसीडी १० टक्क्यांवरून पाच टक्क्यांपर्यंत आणि शुद्ध केलेल्या सोयाबीन तेल आणि पाम तेलावरील बीसीडी ३२.५ टक्क्यांवरून २७.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्यात आली आहे. काही खाद्यतेलांच्या आयातीवरील सीमा शुल्क कमी करण्याचा निर्णय सणासुदीचा काळ जवळ आल्याने एका महत्त्वाच्या वेळी आला आहे. कमी आयात शुल्कामुळे आयात केलेल्या खाद्यतेलाची किंमत कमी होईल, ज्यामुळे ग्राहक

पाम तेलाची मागणी कमी होणार

आयव्हीपीएच्या अध्यक्षांनी नमूद केले की, भारत अजूनही आपल्या खाद्यतेलाच्या गरजांसाठी मोठ्या प्रमाणात आयातीवर अवलंबून आहे. ते म्हणाले की, त्यामुळे देशांतर्गत बाजारपेठ आंतरराष्ट्रीय खाद्यतेलाच्या किमती आणि जागतिक पुरवठ्याच्या परिस्थितीसाठी संवेदनशील आहे. देसाई म्हणाले, "सूर्यफूल तेल आणि सोयाबीन तेलाच्या आयातीमधील अधिक लवचिकतेमुळे पाम तेलाची मागणी कमी होऊ शकते. बी५० जैवइंधन अनिवार्यतेची अंमलबजावणी आणि लागवडीखालील क्षेत्रातील वाढीतील मंदगतीमुळे पाम तेल तुलनेने महाग राहण्याची अपेक्षा आहे.

किमतींमध्ये काही प्रमाणात नियंत्रण येऊ शकते, असे मत आयव्हीपीएचे अध्यक्ष सुधाकर देसाई यांनी व्यक्त केले. ते म्हणाले की, आगामी सणासुदीच्या महिन्यांत देशभरात पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करणे हे खाद्यतेल उद्योगाचे तत्काळ प्राधान्य आहे.

कर्मचाऱ्यांनी ग्राहकांकडून केली सहकार्याची मागणी

२८ ते ३० सप्टेंबर दरम्यान बँक संपाचा प्रस्ताव

▸ मुंबई, वृत्तसंस्था. २८, २९ आणि ३० सप्टेंबर २०२६ रोजी प्रस्तावित बँक संपासंदर्भात, बँक कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी ग्राहकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल खेद व्यक्त केला असून आपल्या आंदोलनाची कारणे स्पष्ट केली आहेत. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, संप हा त्यांचा पहिला पर्याय नाही. चर्चा, निवेदने, वाटाघाटी आणि संवाद यांसारख्या सर्व प्रयत्नांनंतरही तोडगा न निघाल्याने संपाचा निर्णय घेण्यात आला आहे.

पाच दिवसांच्या बँकिंग सप्ताहाची मागणी

बँक ऑफ महाराष्ट्र ऑफिसर्स असोसिएशनचे अध्यक्ष राजीव ताम्हाणे यांच्या मते, पाच दिवसांच्या बँकिंग सप्ताहाची मागणी बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. ते म्हणतात की, ८ मार्च २०२४ रोजी आयबीए आणि कर्मचारी-अधिकारी संघटनांमध्ये पाच दिवसांचा बँकिंग सप्ताह लागू करण्याबाबत एक करार झाला होता. आवश्यकतेनुसार सोमवार ते शुक्रवारपर्यंत कामाचे तास वाढवून याची अंमलबजावणी करण्याचा प्रस्ताव सरकारला पाठवण्यात आला होता, परंतु अद्याप अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

तर बँकेला ५ हजारांचा दंड

▸ दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गृहकर्जाचे ओझे पूर्णपणे दूर झाल्यावर आयुष्यात सर्वांत मोठा दिलासा मिळतो. आपला शेवटचा ईएमआय भरल्यानंतर, बहुतेक लोक सुटकेचा निःश्वास टाकतात. त्यांना वाटते की बँकेतील त्यांचे खाते आता निकाली निघाले आहे. पण प्रत्यक्षात, संपूर्ण कर्जाची रक्कम फेडल्यानंतरही, एक अत्यंत महत्त्वाचे काम शिल्लक राहतेः बँकेकडून मालमत्तेची मूळ कागदपत्रे सुरक्षितपणे परत घेणे. अनेकदा, कर्ज फेडल्यानंतर आठवडे किंवा महिने उलटूनही, बँका ग्राहकांना घराची मूळ कागदपत्रे परत करत नाहीत. ग्राहकांना आपली मालमत्तेची कागदपत्रे परत मिळवण्यासाठी बँकेत वारंवार फेऱ्या माराव्या लागतात. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी, भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) कठोर उपाययोजना केल्या आहेत. नवीन नियमांमुळे सामान्य ग्राहकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

आरबीआयचा ३० दिवसांचा नियम

रिझर्व्ह बँकेच्या निर्देशानुसार, एखादा ग्राहक आपल्या कर्जाची पूर्ण परतफेड करतो, तेव्हा बँकेने मालमत्तेची सर्व मूळ कागदपत्रे ३० दिवसांच्या आत परत करणे बंधनकारक आहे. इतकेच नव्हे, तर मालमत्तेवरील बँकेचा बोजा देखील संबंधित नोंदणीतून तत्काळ काढून टाकला पाहिजे. हे नियम १ डिसेंबर २०२३ पासून, अशा सर्व प्रकरणांमध्ये लागू आहेत जिथे बँका किंवा वित्तीय संस्था ग्राहकाच्या मालमत्तेची कागदपत्रे गहाण ठेवतात.

दीड वर्षात रुपयाचे १३.१% अवमूल्यन

दिल्ली, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. गेल्या दीड वर्षात रुपयामध्ये झालेली १३.१% घसरण ही एक तात्पुरती घटना असू शकते. रुपयामध्ये केवळ सध्याच्या पातळीवरून स्थिर होण्याचीच नव्हे, तर मजबूत होण्याचीही क्षमता आहे, असा विश्वास भारतीय रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नर पूनम गुप्ता यांनी व्यक्त केला. त्या मुंबईत आयोजित १३ व्या एसबीआय बँकिंग अँण्ड इकॉनॉमिक्स कॉन्क्लेव्हला संबोधित करत होत्या. ३१ मार्च २०२५ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत रुपयामध्ये एकूण १३.१% घसरण झाली. याला रुपयाचे अत्यधिक अवमूल्यन किंवा 'ओव्हरकरेक्शन' असेही मानले जाऊ शकते. भांडवली प्रवाहाचे उपाय जाहीर झाल्यावर बाजार विश्लेषकांनाही रुपया मजबूत होण्याची अपेक्षा होती, असेही गुप्ता यांनी सांगितले.

रुपयाला फायदा, निर्यातीला आधार

गेल्या दोन आर्थिक वर्षांमध्ये भारताचा व्यवहार तोलात नकारात्मक राहिला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुमारे ५ अब्ज डॉलर्स आणि २०२५-२६ मध्ये २३.६ अब्ज डॉलर्सचा नकारात्मक व्यवहार नोंदवला गेला. याचे एक कारण म्हणजे भांडवली खात्यातील अधिशेष चालू खात्यातील तुटीपेक्षा कमी होता. येत्या काही वर्षांत भारताची चालू खात्यातील तूट आणखी कमी होण्याची अपेक्षा आहे. सेवा निर्यात आणि परदेशातून येणारा पैसा (रेमिटन्स) ही भारताची पारंपरिक बलस्थाने आहेत. वस्तूंच्या निर्यातीतील वाढते यश हे भारतासाठी एक नवीन बलस्थान म्हणून उदयास येत आहे, असेही गुप्ता म्हणाल्या. अलीकडील मुक्त व्यापार करारांचा सकारात्मक परिणाम आणि अनुकूल विनिमय दर देखील निर्यातीला आधार देऊ शकतात.

यूपीआयचा ग्राहकांना भुर्दंड

मुंबई. एकूण यूपीआय व्यवहार मूल्याच्या केवळ १० टक्के रकमेवरच प्रस्तावित 'मर्चंट डिस्काउंट रेट' शुल्काचा बोजा ग्राहकांवर पडण्याची शक्यता आहे, असा अंदाज नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप आस्बे यांनी गुरुवारी व्यक्त केला. एमडीआरमधून मिळणाऱ्या रकमेपैकी सुमारे ८० टक्के रक्कम १,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त वार्षिक उलाढाल असलेल्या मोठ्या व्यवसायांकडून येईल, जे आधीपासूनच क्रेडिट कार्ड स्वीकारतात आणि खूप जास्त शुल्क भरतात.